सकाळ

# पानस, काटवलीमध्ये १०० टक्के लसीकरण

**केळघर, ता. २ :** क्विक हेल, सीवायडीए पुणे आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क या तिन्ही संस्थांच्या वतीने जावळी तालुक्यात कोरोना लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेंतर्गत पानस, काटवली, भुतेघर मुरा येथील १०० नागरिकांचे कोविड लसीकरण करण्यात आले. यामध्ये प्रत्येक गावचे १०० टक्के लसीकरण कसे पूर्ण करता येईल याकडे लक्ष देण्यात आले आहे. या मोहिमेमध्ये सरकारी यंत्रणांची मदत घेण्यात आली आहे. या प्रसंगी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. जीवन बोराटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान मोहिते, विद्यार्थी स्वयंसेवक संकेत माने, निखिल रामावत, ओंकार पाटील, सागर पळसे, तेजस भिलारे, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विकास मानकुमरे उपस्थित होते. या कोरोना महासाथीच्या परिस्थितीमध्ये यशवंतराव चव्हाण समाजकार्य महाविद्यालयाने जावळी तालुक्यात विविध उपक्रम सामाजिक बांधिलकीतून राबवले आहेत. भुतेघर मुरा येथील ग्रामस्थांनी लसीकरणाचा लाभ घेतला.

Satara, Satara-Today
03/11/2021 Page No. 3